दै. देशोन्नती दि. 21/11/2023

# भाग्यनगर हद्दीतून सोन्याची चैन चोरणारे दोघेजण वजीराबाद पोलिसांच्या ताब्यात

## गुन्हे शोध पथकाची कामगिरी, पावणे दोन लाखाचा मुद्देमाल जप्त



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत महिलेच्या गळयातील सोन्याची चैन जबरीने चोरून नेणाऱ्या दोन चोरट्यांना वजीराबाद ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने १९ नोव्हेंबर रोजी २४ तासाच्या आत अटक केली असून त्यांच्याकडून १ लाख ७८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास डॉ. देशमुख यांच्या घराजवळ सुजाली भट यांच्या गळयातील अडीच .तोळयाची सोन्याची चैन मोटारसायकलवर आलेले दोन चोरटे काढुन घेवून फरार झाले होते. याप्रकरणी भाग्यनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीतांचे व वाहनाचे वर्णन तसेच आरोपीचे सिसीटीव्ही फुटेजवरुन आरोपीचा शोध घेणेबाबत वरिष्ठांनी आदेश दिले होते.

सदर सुचनांप्रमाणे पो.नि. अशोक घोरबांड यांनी गुन्हे शोध पथकाचे अधिकारी सपोनि शिवराज जमदडे, पोहेकॉ दत्तराम जाधव, शरदचंद्र चावरे, बालाजी कदम, रमेश सुर्यवंशी, शेख ईम्रान, भाऊसाहेब राठोड यांना घटना घडलेल्या परिसरातील सर्व सिसीटीव्ही फुटेज तपासणी करुन आरोपी व गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल व सोन्याची चैन जप्त करण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान सदर आरोपी शेख कलीम शेख शकील रा. खडकपूरा व सय्यद जावेदोद्दीन उर्फ जावेद सलीमोद्दीन हे सध्या खडकपूरा पाण्याच्या टाकीखाली मोटरसायकलसह असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर माहितीवरुन वजीराबाद ठाण्याच्या डीबी पथकाने १२ वाजता मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी छापा मारून दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरी केलेली सौन्याची चैन व गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण १ लाख ७८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

दै. पुण्यनगरी

# खंजरसह तरुण ताब्यात

**नांदेड / प्रतिनिधी**

शहरातील वसंतनगरमधील एका वीज खांबाजवळ धारदार खंजर बाळगलेल्या चोरट्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. वसंतनगरमधील सार्वजनिक रस्त्यावरील वीज खांबाजवळ काही जण उभे असून त्यांच्याकडे खंजर असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोहेकॉ सोमनाथ पत्रे यांनी दि. १८ नोव्हेंबर रोजी दुपारी १.३० वाजता उपरोक्त ठिकाणी जाऊन काही संशयितांना ताब्यात घेतले. त्यापैकी एकाजवळ धारदार खंजर सापडला. पत्रे यांनी या प्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरुन विमानतळ पोलिस ठाण्यात गुरनं ३८२/२३ कलम ४/२५ दाखल करण्यात आला आहे. सपोउपनिरीक्षक पांचाळ पुढील तपास करीत आहेत.